श्रीरामपूर पंचायत समिती (जि.अहमदनगर) नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः पंसई-२०१९/प्र.क्र.३९/बांध-४

५ वा मजला, मर्झबान पथ, २५ बांधकाम भवन,

फोर्ट, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१

तारीख : २४ जुलै, २०१९

वाचा :-

१) **अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचे पत्र क्रमांकः** बांध/कार्या-४/प्रशा-१/५/सन २०१९, दिनांक ०५ जानेवारी, २०१९.

२) **कार्यकारी अभियंता (बां.), जिल्हा परिषद, अहमदनगर यांचे पत्र क्रमांकः** बांध/पीओ/३५४/२०१९, दिनांक २८ जून, २०१९.

प्रस्तावना :-

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी उक्त वाचा मधील अनुक्रमांक १ येथील दिनांक ०५ जानेवारी, २०१९ रोजीच्या पत्रान्वये व कार्यकारी अभियंता (बां.), जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी उपरोक्त वाचा मधील अनुक्रमांक २ येथील दिनांक २८ जून, २०१९ रोजीच्या पत्रान्वये, श्रीरामपूर पंचायती समिती, जिल्हा अहमदनगर नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विनंती केली आहे.

०२. श्रीरामपूर पंचायत समितीची अस्तित्वातील इमारत १९६६ मध्ये बांधण्यात आलेली असून, या इमारतीचे वॉटर प्रुफिंग व इतर दुरूस्तीची कामे सन १९७८ व सन १९८४ मध्ये करण्यात आलेली आहे. शासनाच्या व जिल्हा परिषदेच्या विविध योजनांकरिता सध्याची इमारत अपुरी पडत असल्यामुळे, श्रीरामपूर येथील पंचायत समितीसाठी नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाची आवश्यकता आहे. पंचायत समिती, श्रीरामपूरच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम श्रीरामपूर येथील गट क्रमांक २१ सी.टी. सर्व्हे नं.१८०७ मधील अंतिम भुखंड ४५९ क्षेत्र ७ हे. ६७ आर मधील सहकारी जमिनीपैकी ०.२० आर या मोकळ्या क्षेत्रावर प्रस्तावित केले आहे. पंचायत समिती, श्रीरामपूर ही “ब” वर्ग दर्जाची असून त्यांनी तळ मजला पर्किंग ८८८.८९ चौ.मी. + पहिला मजला ८८८.८९ चौ.मी. + दुसरा मजला ८८८.८९ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम प्रस्तावित केले आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी सादर केलेले पंचायत समिती, श्रीरामपूर नवीन प्रशासकीय इमारतीकरिता उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ सा.बां.प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांचे क्रमांक अहमदनगर(४)१०/३१५/सन-२०१४, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१४ अन्वये, जॉब क्र.AHDR-३०३-३७२ नमुना नकाशावर आधारित, रू.८५९.५२ लक्ष किंमतीचे सविस्तर

अंदाजपत्रक सन २०१८-१९ च्या दरसूचीवर आधारित असून ते कार्यकारी अभियंता (बां.), जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी साक्षांकित केलेले आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी प्रस्तावासोबत पंचायत समितीच्या ठरावाची प्रत, नमुना नकाशाची प्रत, जागेचा उतारा, ले-आऊट प्लॅन, साईट प्लॅन, स्थळ दर्शक नकाशा, अस्तित्वातील इमारत बांधकामाचे फोटो इत्यादी कागदपत्रे सादर केलेली आहेत.

०३. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या छाननी अंती, श्रीरामपूर पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामासाठी एकूण रुपये ७०३.५० लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

श्रीरामपूर पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी एकूण रुपये ७,०३,५०,००० (रुपये सात कोटी तीन लक्ष पन्नास हजार फक्त) इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या बांधकामास पुढील अटींच्या अधीन राहून, या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बांधकामास तांत्रिक मान्यता देण्यापुर्वी संकल्पन तपासून घेणे आवश्यक राहील.
२) प्रस्तुत इमारतीचे बांधकाम मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सा.बां.मंडळ, मुंबई यांच्याकडील विहित नमुना आराखड्यानुसार हाती घेण्यापूर्वी, स्थानिक नगररचना प्राधिकरणाची तसचे अग्निशमन यंत्रणेची मंजुरी घेणे बंधनकारक राहील.
३) नियोजित आराखड्यात महिला पदाधिकाऱ्यासाठी प्रसाधनगृहासह विश्रांती कक्षाचे संकल्पन करण्यात येवून, सदर व्यवस्था इमारतीमध्ये निर्माण करण्यात यावी.
४) प्रस्तुत प्रशासकीय इमारत बांधकामामध्ये ग्रीन बिल्डींग संकल्पना अंमलात आणून, नैसर्गिक प्रकाशयोजना व वायुवीजन, पाण्याच्या व उर्जेच्या वापरात काटकसर, पर्जन्य जलपुन:र्भरण आणि जास्तीत जास्त पर्यावरणपूरक बांधकाम साहित्य व साधन-सामुग्रीचा वापर करणे आवश्यक राहील.
५) प्रस्तुतचे काम हाती घेतल्यापासून जास्तीत जास्त दोन वर्षात पूर्ण होईल, असे नियोजन करून, इमारत बांधकामाचा त्रैमासिक प्रगती अहवाल वेळीच शासनास पाठविण्याची संबधित कार्यकारी अभियंता (बांध.), जिल्हा परिषद यांनी दक्षता घ्यावी.
६) या प्रकरणी सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली जाणार नसल्याने, मंजूर प्रशासकीय मान्यता किंमतीतच काम पूर्ण करण्याची संबधित कार्यकारी अभियंता (बांध), जिल्हा परिषद यांनी दक्षता घ्यावी.
७) या कामी प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक खर्च झाल्यास तो संबंधित पंचायत समिती/जिल्हा परिषदेने सोसावा.

८) प्रस्तुत प्रशासकीय इमारतीमध्ये अपंगांना सोयी-सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने रॅम्प, रेलींग व तत्सम सुविधा निर्माण करणे बंधनकारक राहील.

९) प्रत्यक्ष इमारतीचे बांधकाम करतेवेळी पर्यावरण विभाग क्र.ईएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां.क.१/दि.१०.०१.२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

०२. श्रीरामपूर पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या सविस्तर अंदाजपत्रकाचा सर्वसाधारण गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

General Abstract For Construction of Shrirampur P. S. Administrative Building		
Sr. No.	**Description of Item**	**Cost (In Rs.)**
A	Cost of Work Portion	39352181.00
B	Add 20 % Escalation for S.S.R. 2018-19	7870436.20
C	Total A + B	47222617.20
D	Add G.S.T. 18 %	8500071.10
E	Total C + D	55722688.30
F	Add 11 % for Electrification	6129495.71
	Add 3 % for Fire Fighting	1671680.65
	Add 0.25 % for External Water Supply	139306.72
	Add 2 % for Rain Water Harvesting	1114453.77
	Add 1 % for Solid Waste Management	557226.88
	Add 6 % for Solar Power System	3343361.30
	Add 1 % for S.Q.M. Charges	557226.88
	Add 2 % for Supervision/ Architect Charges	1114453.77
	TOTAL (E + F)	**70349893.97**
	SAY	**7,03,50,000/-**

०३. उपरोक्त बांधकामासाठी संबधित सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर, अनुदान स्वरूपात टप्प्या-टप्प्याने निधी उपलब्ध करुन दिला जाणार असून, तो उपलब्धतेनुसार अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BDS) द्वारे वितरीत करण्यात येईल. यावरील खर्च "२५१५-इतर ग्रामीण विकास कार्यक्रम १०१, पंचायती राज ३१ सहाय्यक अनुदाने (०१) (०३) जिल्हा परिषदांच्या इमारती बांधकामासाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (२५१५ ००५३) " या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

०४. या कामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याकडून तांत्रिक मान्यता घेण्यात येऊन त्याची प्रत शासनास सादर करावी तसेच या कामास पुरेसा निधी प्राप्त झाल्यानंतर कामाचे आदेश देण्यात यावेत.

०५. प्रस्तुत कामाची माहिती कंस्ट्रक्शन ट्रॅकर प्रणालीवर अद्ययावत करावी.

०६. प्रस्तुतचा शासन निर्णय वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग-पाच, अनुक्रमांक १, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक

१३४ खाली, प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०७२४१०५८५५३६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dilip Babasaheb Patil

Digitally signed by Dilip Babasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e461e0a32ec649f0a60e4372f7cbbb3edff433d33cc0d95db6f8dbf1fa4f7f, cn=Dilip Babasaheb Patil
Date: 2019.07.24 11:33:03 +05'30'

(दि.बा.पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/विधान परिषद.
२. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
३. महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२, नागपूर.
४. मुख्य अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो.,कॅम्प ऑफिस, मध्यवर्ती इमारत, पुणे.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर.
६. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर.
७. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर.
८. कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, अहमदनगर.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा अहमदनगर.
१०.मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, अहमदनगर.
११.उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक.
१२.जिल्हा लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, अहमदनगर.
१३.सभापती, पंचायत समिती, श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर.
१४.गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर.
१५.निवडनस्ती, कार्यासन बांध-४, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.